सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०२५/प्र.क्र.२६/सेवा-४, दि. १०/०७/२०२५.

**विषय** :- प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांचे अंशदान त्यांच्या PRAN खाती वेळेवर जमा करण्यासाठी सुधारीत कार्यपध्दतीबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०२५/प्र.क्र.२६/सेवा-४, दि. १०/०७/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७१०१६१८०९३४०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 14-07-2025 21:22:13

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / नियोजन व समन्वय / कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / धोरण / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांचे अंशदान त्यांच्या PRAN खाती वेळेवर जमा करण्यासाठी सुधारीत कार्यपध्दतीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०२५/प्र.क्र.२६/सेवा-४,**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १०.०७.२०२५.

**वाचा :** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-२०१५/(NPS)प्र.क्र.३२/सेवा-४, दि.०६.०४.२०१५.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-२०१७/प्र.क्र.२७/सेवा-४, दि.२८.०७.२०१७.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विषद करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१४ व ३९ अन्वये स्वीयेत्तर सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांचे राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीअंतर्गत अंशदाने केंद्रीय देखभाल अभिकरणाकडे वर्ग करण्याची कार्यपध्दती विषद केलेली आहे. तसेच संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकान्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची सेवा स्वीयेत्तर सेवेकडे वर्ग करणाऱ्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कर्मचाऱ्यांच्या नोंदणीच्या अनुषंगाने तसेच अधिदान व लेखा कार्यालय/ जिल्हा कोषागार कार्यालय यांनी सेवार्थ प्रणालीतील उपलब्ध सुविधांद्वारे चलन नोंदणी कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहे. उपरोक्त दोन्ही संदर्भांन्वये, प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी यांची अंशदाने वेळीच केंद्रीय देखभाल अभिकरणाकडे पाठविण्याबाबत खात्री करावयाची असल्याचेही सुचित करण्यात आले आहेत.

२. विषयांकित प्रकरणी सुलभ कार्यपध्दती असूनही स्वीयेत्तर सेवेतील कर्मचाऱ्यांची अंशदाने केंद्रीय देखभाल अभिकरणाकडे पाठविण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. स्वीयेत्तर सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांचे स्वत:चे अंशदान व नियोक्त्याच्या अंशदानाच्या रकमा वेळीच त्यांच्या PRAN खाती जमा करण्याच्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

स्वीयेत्तर सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांचे स्वत:चे अंशदान व नियोक्त्याचे अंशदान संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयामधील परिच्छेद क्रमांक १४ व ३९ अन्वये कोषागाराने सेवार्थ प्रणालीत नोंदणी करुन SCF फाईलच्या आधारे अंशदाने केंद्रीय देखभाल अभिकरणाकडे पाठविण्यात येत होती, त्यात बदल

करुन स्वीयेत्तर सेवेतील कार्यालयाची सेवार्थ प्रणालीत अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयाने नोंदणी करुन दिल्यावर चलन नोंदणी स्वीयेत्तर सेवेतील प्राधिकरणाने बनवणारा (MAKER) म्हणून व अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालयाने तपासक (CHECKER) म्हणून अंशदाने केंद्रीय देखभाल अभिकरणाकडे पाठविण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दती खालीलप्रमाणे -

**अ) स्वीयेत्तर कार्यालयांसाठी सेवार्थ प्रणालीमध्ये लॉगिन उपलब्ध करुन देणे (challan entry maker module)**

i. स्वीयेत्तर सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या अंशदानाच्या रकमा त्यांच्या PRAN खाती जमा करण्याच्या प्रयोजनार्थ स्वीयेत्तर सेवेतील कार्यालयांनी प्रथम सेवार्थ प्रणालीमध्ये लॉगिन उपलब्ध होण्याकरिता सोबत जोडलेल्या नमुना अ प्रमाणे प्रस्ताव अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांच्याकडे पत्रासोबत ऑफलाईन पध्दतीने सादर करावा.

ii. अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी संबंधित प्रस्तावाची पडताळणी करुन सेवार्थ प्रणालीमध्ये स्वीयेतर कार्यालयांना challan entry module maker login उपलब्ध होण्याकरिता नमुना-अ मधील तपशील सेवार्थ प्रणालीत भरुन त्या प्रस्तावास मान्यता द्यावी.

iii. अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी सदर प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर स्वीयेत्तर सेवेतील कार्यालयांना सेवार्थ प्रणालीमध्ये challan entry module maker login उपलब्ध होईल. सदरचे लॉगिन हे केवळ स्वीयेत्तर सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेंतर्गत मासिक अंशदानाच्या रकमा सेवार्थ प्रणालीत नोंद घेण्यापुरते मर्यादित असेल.

iv. अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी स्वीयेतर सेवेतील कार्यालयांना सेवार्थ प्रणालीमध्ये challan entry module maker login generate झाल्याबाबत पत्राद्वारे युझर आयडी व पासवर्ड कळवावा.

**ब) स्वीयेत्तर सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांची सेवार्थ प्रणालीत नोंदणी -**

i. राज्य शासनातील अधिकारी/कर्मचारी स्वीयेत्तर सेवेतील पदावर नियुक्त झाल्यास, स्वीयेत्तर सेवेतील कार्यालयाने संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांची नमुना-ब मधील माहिती सेवार्थ प्रणालीत भरावी व सदर स्वीयेत्तर सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांस सेवार्थ प्रणालीमध्ये Attach करुन घ्यावे. नमुना-ब ची माहिती अधिदान व लेखा कार्यालय/जिल्हा कोषागार कार्यालय यांच्याकरीता सेवार्थ प्रणालीमध्ये उपलब्ध होईल.

ii. अधिदान व लेखा कार्यालय/जिल्हा कोषागार कार्यालय यांनी नमुना-ब ची पडताळणी करुन त्यास तीन कामाच्या दिवसात online मान्यता द्यावी.

क) <u>Challan Entry Module Maker Login द्वारे सेवार्थ प्रणालीत challan entry करणे-:</u>

i. स्वीयेतर सेवेतील कार्यालयाने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या सर्व स्वीयेतर सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या एकूण कर्मचारी अंशदानाच्या रकमेचे चलन राज्य शासकीय कर्मचारी यांचेकरीता मुख्य लेखाशीर्ष ८३४२५२१२, अखिल भारतीय सेवेतील अधिकारी- भारतीय प्रशासन सेवा मुख्य लेखाशीर्ष ८३४२५२२१, भारतीय पोलीस सेवा मुख्य लेखाशीर्ष ८३४२५२४१ व भारतीय वन सेवा मुख्य लेखाशीर्ष ८३४२५२६८ या लेखाशीर्षाखाली व नियोक्त्याच्या अंशदानाच्या रकमेचे चलन मुख्य लेखाशीर्ष ८३४२५१५२ या लेखाशीर्षाखाली शासनखाती भरावे. उपरोक्त लेखाशीर्ष अचूक नमूद केल्याची खात्री संबधित स्वीयेतर सेवेतील आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी.

ii. त्यानंतर स्वीयेतर सेवेतील कार्यालयाने सर्व स्वीयेतर सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या मासिक अंशदानाचा तपशील सेवार्थ प्रणालीमध्ये नमुना-क मध्ये भरुन त्यासंबंधीत चलनाच्या प्रती सेवार्थ प्रणालीत अपलोड करुन अधिदान व लेखा कार्यालय/जिल्हा कोषागार कार्यालयास सादर करावे (Forward to TO). यावेळी संबधित स्वीयेतर सेवेतील आहरण व संवितरण अधिकारी यांनी नमुना-क मधील १०% व १४% अंशदानाच्या रकमा व चलनाची एकूण रक्कम अचूक असल्याची खात्री करावी. याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित स्वीयेतर सेवेतील आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

iii. अधिदान व लेखा कार्यालय/जिल्हा कोषागार कार्यालय यांनी कर्मचारी अंशदान १०% व नियोक्त्याचे अंशदान १४% रकमेचा तपशील व चलनाची रक्कम यांची पडताळणी करावी. सदर चलनाची रक्कम Treasurynet प्रणालीतील Receipt Login/Bank Scroll मध्ये जमा झाल्याबाबत खात्री करावी. सदर रकमेत तफावत अथवा नमूद केलेल्या लेखाशीर्षामध्ये अचूकता दिसून आली नाही तर सदर नमुना-क नाकारण्याची सुविधा कोषागार स्तरावर उपलब्ध राहील. सर्व पडताळणी अंती कोषागार कार्यालयाने स्वीयेत्तर कर्मचारी/अधिकारी यांच्या राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेंतर्गत मासिक अंशदानाच्या SCF तयार करुन NPSCAN प्रणालीवर अपलोड करावी. संबंधित अधिदान व लेखा अधिकारी/ जिल्हा कोषागार अधिकारी कर्मचाऱ्याचे अंशदान व नियोक्त्याचे अंशदान या दोन्ही रकमा आहरित करण्याकरिता साधी पावती नमुना ४५-अ मध्ये एक देयक कोषागारात सादर करावे. सदर देयकाव्दारे आहरित करण्यात आलेल्या अंशदानाची एकूण रक्कम शासनाच्या लेख्यात (लेखाशीर्ष ८३४२०१३२) खर्ची टाकण्यात येऊन, सदर रकमा विहित कालमर्यादेत विश्वस्त बँकेकडे जमा करण्यात याव्यात.

iv. प्रणालीवर मान्यता देणे तसेच मासिक अंशदाने विहित कालावधीत केंद्रीय देखभाल अभिकरणाकडे जमा करणे याबाबतची कार्यवाही सहायक संचालक, राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना (NPS)/ अप्पर कोषागार अधिकारी, राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) यांनी करावी.

v. अधिदान व लेखा कार्यालय/जिल्हा कोषागार कार्यालय व स्वीयेतर सेवेतील आहरण व संवितरण अधिकारी यांनी स्वीयेत्तर कर्मचारी/अधिकारी यांच्या मासिक अंशदानाच्या रक्कमा त्यांच्या PRAN खाती जमा करण्यासाठी शासन परिपत्रक क्र. रानियो-२०२३ /प्र.क्र.६४/ सेवा-४, दि. ०४/१२/२०२३ मधील विहित केलेल्या कालमर्यादेचे पालन करावे.

२. सदर शासन परिपत्रक वित्त विभाग / कोषा प्रशा-४ यांचे अनौ.संदर्भ क्र.३७/२०२५/कोषा प्रशा-४, दि.०४.०७.२०२५ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०७१०१६१८०९३४०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANISHA YUVRAJ KAMTE

Digitally signed by MANISHA YUVRAJ KAMTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=a7f08db3910ecf0f88c442fbde20f7b84e70dfd0bf4dcd977ab ab75b3fcb8508, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=11602E78DA072F96AF0EDE7966315FA5B93A2119E4 A490D340E527F96DBA01D3, cn=MANISHA YUVRAJ KAMTE
Date: 2025.07.10 16:19:22 +05'30'

**(मनिषा कामटे)**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४)मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५)मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य.
८) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय, मुंबई.
१०) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
१२) मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
१३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१५) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.

१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१७) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
१८) प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
१९) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२०) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
२१) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२२)सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२३) मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,मुंबई.
२४) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
२५) सर्व विभागीय आयुक्त.
२६) सर्व जिल्हाधिकारी.
२७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२८) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२९) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
३०) सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद /अमरावती / नागपूर.
३१) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
३२) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती नागपूर.
३३) वित्त विभागातील सर्व कार्यासने.
३४) निवड नस्ती

## नमुना-अ

## **Registration Form for Deputation Office**

1. Office Name :-

2. Administrative Department :-

3. Field Department :-

4. Office Address :-

5. Taluka :-

6. District :-

7. Pin code :-

8. Telephone No :-

9. Email ID -:

( Signature )
Head of the Office
Deputation Office

नमुना-ब

# Registration Form for Officer / Employee on Deputation

1. Deputation Office Name :-
2. Name of the Officer/Employee on Deputation :-
3. Designation :-
4. Sevaarth ID :-
5. DCPS No. :-
6. PRAN No. :-
7. Category :-
8. Appointment date on Deputation :-
9. Basic Pay :-

| | | | |
|---|---|---|---|
| Upload LPC | Upload Appointment | Upload Joining Order | Attached Employee |

# नमुना-क

## FORM-2 (Deputation Employee)

(As referred to in para no. 14.15.17 & 28 of Government Resolution, Finance Department, No. CPS 1007/18/SER-4,dated 7 July, 2007)

Schedule Showing Employee's contribution and Employer's contribution towards Tier 1 of the NPS.

For the Month of -----------

Name of Office: ------------------------ Name of DDO/Code No.------------------ Department Code ---------------------

Region/Treasury/Sub-Treasury Code:--------

| Sr. No. | Name of Employee | Category | DCPS No. | PRAN No. | Period From | Period To | Basic Pay (Rs.) | D.P. (Rs.) | D.A. (Rs.) | Employee Contribution | Employer Contribution | Total Contribution |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| Total Amount of Employee's Contribution - Head Of Account 8342- other Deposits, 117-Government Employee's Defined Contribution Pension Scheme (02)(01)- Defined Contribution Pension Scheme,<br>State Government Employee's Contribution Tier-1 (8342 521-201),<br>All India Service – IAS Officer's Contribution Tier-1 (8342 522-101),<br>All India Service – IPS Officer's Contribution Tier-1 (8342 524-101),<br>All India Service – IFS Officer's Contribution Tier-1 (8342 526-801),<br>32-Contributions (10%) | | | | | | | | | | 10% | 14% | |
| Add - Employer's contribution (not applicable in case of Government Employees)Head of Account 8342-Other Deposits, 117-Government Employees Defined Contribution Pension scheme (02)(02)- Defined Contribution Pension Scheme, Government Employer's Contribution Tier-1(8342 515-201), 32-Contributions (14%) | | | | | | | | | | | | |
| Grand Total | | | | | | | | | | | | |

P.T.O.

Total Amount Rupees: ---------------/- In words Rupees-------------------------- under the Major Head Of Account ----------

( Show the details of Service Head of Account here)Gross Amount of the bill/challan Rs.------Net Amount of the bill/challan Rs.-

Challan No. -----------------& Date.---------------

**CERTIFICATE**

Certified that I have personally verified the correctness of the details in this schedule and they are found to be correct.

Date: ----------------- Date of Encashment:-------------------

Signature

Name, &Designation of the Drawing and Disbursing

Officer & Office Address

For Use of Audit Officer:

1: Certified that the name, amount of the individual's deduction and the total shown in column(10&11) have been checked with reference to the bill, vide, paragraph 224 of the Audit Manual

2: Certified that the rate of pay as shown in column (5) has been verified with the amount actually drawn in the bill

3: Certified that challan for Rs. is attached to this schedule

Signature

(Name)

Treasury Officer

Office Address